जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2019
पुण्यनगरी

नॅक मूल्यांकनाची शिवाजी विद्यापीठात तयारी

कोल्हापूर / प्रतिनिधी :

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध माध्यमातून आपला ठसा उमटविणारे शिवाजी विद्यापीठ सध्या नॅक मूल्यांकनासाठी सज्ज होत आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढीबरोबरच गेल्या काही महिन्यांपासनू पायाभूत सोयी-सुविधा अधिक चांगल्या करण्यासाठी विद्यापीठ प्रशासन प्रयत्न करत आहे.

उच्च शिक्षणाची गुणवत्ता, संशोधनावर आधारित दर्जा ठरविण्यासाठी दर पाच वर्षांनी 'नॅक' (नॅशनल असेसमेंट ॲक्रिडिटेशन कौन्सिल, राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद) मार्फत महाविद्यालये आणि विद्यापीठाचे मूल्यांकन केले जाते. या शिक्षण संस्थांच्या दृष्टीने 'नॅक'च्या मूल्यांकनाला विशेष

महत्त्व आहे. यापूर्वी विद्यापीठाला २०१४ मध्ये ए, २००३ मध्ये बी प्लस आणि २००९ मध्ये बी ग्रेड मानांकन मिळाले आहे. आजवर नॅक मानांकनामध्ये विद्यापीठाचा आलेख चढता आहे. सप्टेंबर महिन्यात मिळालेल्या आयएसओ मानांकनाचाही लाभ नॅक मानांकन उंचावण्यात होईल, असा विश्वास विद्यापीठ प्रशासनाला आहे.

यंदाही अशीच कामगिरी करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने कंबर कसली आहे. सध्या पायाभूत सुविधांची विविध कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यामध्ये मेन गेटची दुरुस्ती करण्यात आली आहे, तर प्राणिशास्त्र, संगीतशास्त्र, मानव्यशास्त्र या विभागांच्या इमारतींची डागडुजी करण्यात आली असून, सर्वच इमारतींची रंगरंगोटी आणि सुशोभीकरण केले जात आहे. विद्यापीठातील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती, विस्तारीकरण आणि सौंदर्यीकरणाची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. काही विभागाच्या इमारतींसमोर त्या विभागाचे महत्त्व पटवून देणारी प्रतीकात्मक चिन्हे लावून त्या इमारतींच्या सौंदर्यात भर टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे. यासह इतर कामे महिन्याभरात पूर्ण करून मूल्यांकनासाठी नॅक समितीला आमंत्रित केले जाणार आहे.

कामगिरीचा चढता आलेख

२०१४ मध्ये शिवाजी विद्यापीठास राष्ट्रीय मूल्यांकन परिषदेकडून (नॅक) ३.१६ गुणांसह 'अ' मानांकन देण्यात आले होते. त्यावेळी राज्यातील अन्य विद्यापीठांच्या तुलनेत विद्यापीठाला मिळालेले गुण सर्वाधिक होते. 'नॅक'ने गुणात्मक पद्धतीत चार, तीन, दोन एक अशी वर्गवारी केली. त्यात सात निकषांवर केलेल्या पाहणीत विद्यापीठ अग्रेसर ठरले होते. त्याच प्रमाणे २०१४ मध्ये ए, २००३ मध्ये बी प्लस आणि २००९ मध्ये बी ग्रेड मानांकन मिळाले.